# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

"उद्योग सारथी",
महाकाली गुंफा मार्ग,
मरोळ औद्योगिक क्षेत्र,
अंधेरी (पूर्व),
मुंबई-४०००९३.

जा.क्र. मऔविम/तां.स./A92493/२०२२

दिनांक : 16/03/2022

## परिपत्रक

विषय: संशोधन आणि विकास (Research & Development) हे उत्पादन औद्योगिक सदरात गणण्याबाबत.

महामंडळाच्या परिपत्रक क्र. मऔविम/का-३/४५८, दिनांक २२/६/२००० अन्वये Industrial R & D Laboratory, Industrial Testing Laboratory आणि Laboratory for Testing of Raw Material and Finished Products ह्या बाबी सेवा म्हणून गणण्यात आलेल्या आहेत. या बाबीसाठी औद्योगिक क्षेत्रातून भूखंड देण्यात येत असेल तर औद्योगिक दराने व वाणिज्यीक क्षेत्रामधून भूखंड देण्यात येत असेल तर वाणिज्यीक दराने देण्यात यावी अशी तरतूद करण्यात आलेली आहे. तथापि, संशोधन आणि विकास (Research & Development) या ॲक्टीव्हीटी मुळे उत्पादन क्षेत्रात गुणवत्तापूर्ण उत्पादने निर्माण होण्यास मदत होते व स्पर्धात्मक रितीने बाजारातील ग्राहकांच्या गरजा भागविण्यास सहाय्यभूत ठरते. तसेच उत्पादन क्षेत्राशी निगडीत ecosystem चे बळकटीकरण होऊन औद्योगिकरणास चालना मिळून महाराष्ट्र राज्यास औद्योगिकरणाच्या बाबतीत नेहमीसाठी अग्रेसर राहण्यास मदत होते. ही बाब लक्षात घेता, संशोधन आणि विकास (Research & Development) या बाबीसाठी नवीन भूखंड देतांना/भूखंडाचे हस्तांतरणाच्या प्रयोजनार्थ संशोधन आणि विकास ही बाब औद्योगिक सदरात गणण्यात यावी व सदरहू भूखंडाचे वाटप औद्योगिक दराने करण्यात यावे. या अनुषंगाने सदरची बाब संचालक मंडळाच्या दि. ३१/०१/२०२२ रोजी झालेल्या ३९२ व्या सभेत सादर करण्यात आली होती. त्यावर सविस्तर चर्चा होऊन चर्चेअंती ठराव क्र. ६३९८ पारीत करण्यात आला.



16/3/22

सदरहू पारीत ठरावानुसार, महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रामध्ये संशोधन आणि विकास (Research & Development) ही ऍक्टीव्हीटी औद्योगिक घटक स्वत:साठी किंवा इतर उद्योगांसाठी कार्यान्वित करत असल्यास त्याच्या लॅबोरेटरीसह सदरची ॲक्टीव्हीटी ही औद्योगिक म्हणून गणण्यात यावी. तसेच संशोधन आणि विकास (Research & Development) या बाबीसाठी नवीन भूखंड देतांना/भूखंडाचे हस्तांतरणाच्या प्रयोजनार्थ संशोधन आणि विकास ही बाब औद्योगिक सदरात गणण्यात यावी व सदरहू भूखंडाचे वाटप औद्योगिक दराने करण्यात यावे, याची सर्व संबंधितांनी नोंद घेऊन त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

16/03/22
( अजित पाटील )
सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन)
मऔविम, मुंबई-९३.

प्रत :

१. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, यांना माहितीसाठी सविनय सादर.
२. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
३. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
४. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
५. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
६. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
७. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर.
८. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
९. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
१०. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
११. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
१२. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१३. सर्व औद्योगिक संघटना.
१४. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय, मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यूटीसी), कफ परेड, मुंबई.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती.